# राशिभविष्य - फेब्रुवारी, २०२१.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==============================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी त्या त्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास आम्हांस कळवावे.**

==============================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी मेष या स्वराशीतच मंगळ असून सोबत हर्षलही आहे. या मंगळामुळे या राशीच्या मंडळींचा स्वभाव हट्टी, मानापमान फार असणारा असा घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही मंडळी अकारण शारीरिक श्रम, दगदग करण्याची शक्यता आहे. तसे झाले तर त्याचा परिणाम अनारोग्य होण्यातही होईल.. तसेच या राशीच्या नोकरदार मंडळींनाही तो प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. सोबत असलेल्या हर्षलमुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी,. धाक, दडपण असह्य होणारा असा घडण्याची शक्यता आहे. या राशीची लहान मुले तर सध्या अति हूड व खोडकर झाली असल्याचे दिसून येईल. असे असले तरी हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या धनस्थानी राहू असून महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ या राशीच्या धनस्थानी जात आहे. राहू प्रतिकुल असून त्याच्यामुळे मनस्ताप, अपमान होणे संभवते. त्यामुळे मनात सूडभावना निर्माण होणे संभवते. शिवाय या राहूमुळे वातविकाराचा आजार होणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात या धनस्थानी मंगळ आल्यावर आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. शिवाय उष्णताविकार बळावून डोळे, घसा, दाढा, मान यांचे अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी केतु असून त्याच्यामुळे कलह, वाद होऊन प्रापंचिक व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. शिवाय तो अनारोग्यकारक होणार असून त्याच्यामुळे अपघातभयही आहे. तसेच त्याच्यामुळे त्वचारोग, रक्तविकार, मुखदन्त रोग असे आजार होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी मकर

राशीत रवि, बुध, शुक, शनि, गुरु असे पाच ग्रह असून हे सर्व ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व लाभदायक होतील. पण शुक्रामुळे महिन्याच्या पूर्वार्धात कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना अडचणी, अडथळे, मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. पण रवि ग्रह या राशीच्या नोकरदार मंडळींना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. बुधामुळे मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. गुरु ग्रह बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळींचा मानसन्मान होणेही संभवते. त्याच्यामुळे काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यताही आहे. रविसह शनि दशम स्थानी स्वराशीत असल्यामुळे काही अविस्मरणीय फलदायी होईल. शुक्र ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर अनुकुल होईल व मनःशांति, धनलाभ, सुखसाधने प्राप्त होतील. या राशीच्या लाभस्थानी असलेला नेपच्यून प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक घोटाळे, आर्थिक नुकसान, अर्थप्राप्तीस विलंब होणे, कुमार्गी मित्रामुळे नुकसान होणे संभवते. त्यामुळे नैराश्य येईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व दिलासा मिळेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून, श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनी कुमाराभ्यां नमः”:मंत्राचा,. भरणी जन्मनक्षत्र असणारांनी “ओम यमाय नमः:” मंत्राचा व कृत्तिका जन्मनक्षत्र असणारांनी “ओम अग्नये नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या व्ययस्थानी मेष या स्वराशीत मंगळ व हर्षल असे दोन ग्रह आहेत. हे दोन्ही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होणार असून त्यांच्यामुळे सांपत्तिक अडचणी, आर्थिक चिंता, मनस्ताप, भांडणे, मानहानी, जिवावरचे प्रसंग, शत्रुत्व निर्माण होणे अशा घटना घडण्याची शक्यता असते. जपा. येथील मंगळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या प्रथम स्थानी आल्यावर स्वभाव हट्टी होईल, अकारण श्रम, दगदग होईल, मानापमान फार होतील, नोकरदार मंडळींना नोकरीत प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. या प्रथम स्थानी राहू आहेच. त्याच्यामुळे अपमान, मनस्ताप सहन करावे लागतील. त्यामुळे काहींच्या मनात सूडभावना निर्माण होईल, काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. मनस्थिती अस्थिर

राहील. या राशीच्या भाग्यस्थानी रवि -बुध -गुरु-शुक्र-शनि असे पाच ग्रह असून त्यापैकी रवि -बुध प्रतिकुल होणार असून रवीमुळे मानसिक ताण, आजार, भय, विरोध, निराशादायक घटना घडण्याची शक्यता आहे. काहींना वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. बुधामुळे भांडणाचे प्रसंग येतील. शिवाय नियोजित कार्यात अडचणी , अडथळे निर्माण होतील. कार्यात दिरंगाई निर्माण होणेही संभवते. शनि साधारणपणे शुभ असेल; शिवाय त्याच्यामुळे दूरच्या प्रवासाचे योग येतील. गुरु-शुक्र हे दोन ग्रह पूर्णपणे अनुकुल होतील; व शुक्रामुळे गुरुकृपा, सुसंगती, ऐषाराम, सुखसमाधान मिळेल. काही मंडळींना थोरकृपा प्राप्त होईल. काही भाग्यवंत मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही संभवते. गुरूमुळे उत्कर्ष होईल. अध्यात्माची आवड असणारांना आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. अपेक्षित संधी मिळेल. प्रवासयोग येतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र या राशीच्या दशम स्थानी जात आहे. त्यावेळी नोकरी-व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होतील. शिवाय नेपच्यूनमुळे नोकरी-व्यवसायातील परिस्थिती अस्थिर राहील. श्रद्धा असेल तर श्रीशिव शंकराची उपासना मनःशांती देईल. दररोज स्नान झाल्यावर “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्रये नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ ओम ब्रह्माय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोम सोमाय नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या लाभस्थानी मंगळ व हर्षल असे दोन ग्रह असून ते दोन्ही प्रतिकुल होण्याचीच शक्यता आहे. हर्षलमुळे सर्व काही अनिश्चितच घडेल. मित्राशी भांडणे होतील. मंगळामुळे कष्ट परिश्रम होऊनच अर्थलाभ होईल. पण काही भाग्यवंत मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगळ या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर पूर्ण अशुभ होईल. पण या व्ययस्थानी राहू आहेच. तो मात्र अनुकुल होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना परदेशवारीची संधी मिळेल. आर्थिक लाभ होतील. हितशत्रू पराभूत होतील. पण तो वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील .जपा. मंगळामुळे वाढत्या खर्चाची चिंता त्रस्त करील. काही मंडळींना मानहानीचा त्रास सहन करावा लागेल. त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. काही मंडळींना स्त्रीवर्गाकडून त्रास होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी केतु असून तो अनुकुल

होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, व्यवसायात सहकार्य लाभेल. मन उदार राहील, आचारविचार उच्च

राहतील व काहींना कीर्ति प्रसिद्धीही मिळू शकेल. या राशीच्या अष्टम स्थानी रवि -बुध-गुरु-शुक्र- शनि असे पाच ग्रह असून त्यापैकी रवि आणि शनि प्रतिकुल होतील. रविमुळे इच्छा आकांक्षा अपूर्ण राहतील. दुःख, मनस्ताप, अनारोग्य सहन करावे लागेल. हाती घेतलेल्या कामात अपयश येईल. संततीपैकी कोणाच्या आजाराची चिंता त्रस्त करील. शनिमुळे क्वचित कोणास मोठा आजार होणे संभवते. असमाधानकारक घटना घडतील. अपेक्षाभंग होणेही संभवते. जपा. पण बुध -गुरु-शुक्र अनुकुल होणार असल्याने सुख समाधान लाभेल, कार्यसिद्धी होईल. गुरु-शुक्रामुळे जन्मकुंडलीत योग असतील तर काही मंडळींना अचानक धनलाभ होईल, तर काहींना वारसा हक्काने असा धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक धनलाभ होईल. परंतु हा शुक्र या राशीच्या वृद्ध मंडळींना प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या भाग्यस्थानी नेपच्यून असून महिन्याच्या उत्तरार्धात रवि व शुक्र या राशीच्या भाग्यस्थानी जात आहेत. येथील नेपच्यून अध्यात्मात रस असणारांना अनुकुल होईल व उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील व काही मंडळींना परदेशवारीची संधी मिळेल. शुक्रामुळे काही मंडळींना गुरुकृपा किंवा थोरकृपा लाभेल. काहींना सुसंगती, सुखसमाधान व ऐषाराम लाभेल. क्वचित कोणास कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही संभवते. पण रवि गृह प्रतिकुल असल्यामुळे काही मनस्ताप देणाऱ्या घटना घडणेही शक्य आहे. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना व श्रीहनुमान उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोम सोमाय नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी "ओम नमः शंकराय " मंत्राचा व ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो गूढ संशोधन व आध्यात्मिक उपासनेस अनुकुल होईल. पण काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या

सप्तम स्थानी मकर राशीत रवि -बुध -गुरु-शुक्र व शनि असे पाच ग्रह आहेत. त्यापैकी बुध -शनि व रवि हे तीन ग्रह प्रतिकुल होणार असून गुरु-शुक्र काही प्रमाणात अनुकुल होतील. रवि ग्रह केंद्रस्थानी असल्यामुळे काही प्रमाणात अनुकुल होईल. रविमुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. बुधामुळे भांडणे होतील व मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. गुरु ग्रह अनुकुल असला तरी तो मकर या त्याच्या नीच राशीत असल्याने फारसा अनुकुल होण्याची शक्यता दिसत नाही. त्याच्यामुळे प्रेमसंबंधात वाढ होईलच याची खात्री देता येत नाही. नवे स्नेहसंबंध जुळून येतील. काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल. क्वचित कोणास प्रवासयोग येईल. तर कोणास अर्थलाभ होणे संभवते. शुक्रामुळे विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळेल. पण शनीमुळे विवाहयोग उशीरा येणे संभवते. येथील रवि -शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी जात आहेत. या अष्टम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून आहेच. हा नेपच्यून जलभयकारक आणि विषभयकारक असल्याने जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाऊ नका. रविमुळे इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील. नियोजित कामात अपयश येईल. संततिसुखात बाधा येणे संभवते. काहीजण भावनेच्या भरात भरकटत जातील. काही मंडळींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. पण शुक्रामुळे कमी परिश्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होणे संभवते. ज्याच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने अचानक धनलाभ होईल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत मंगळ व हर्षल असे दोन ग्रह असून मंगळामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. नोकरदारमंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल. वरिष्ठांशी वाद, भांडणे होतील. काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण औषधविक्रेते आणि यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना हा मंगळ अनुकुल व लाभदायक होण्याची शक्यता आहे. हर्षल ग्रह उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व धनलाभदायक होईल. काही मंडळींना बढती, पगारवाढ, अधिकारपदही मिळू शकेल. येथील मंगळ दिनांक २१ पासून या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर या राशीच्या काही भाग्यवंत मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होण्याची शक्यता आहे. पण त्याच्यामुळे मित्रांशी भांडणे होतील, काही मंडळींना कष्ट परिश्रमानेच अर्थलाभ होईल. या लाभस्थानी राहू आहेच. त्याच्यामुळे जुगाराचा नाद असणारांना

अर्थहानीच सहन करावी. लागेल. नोकरीत अधिकार पद असणारांना अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा होईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून तसा विचारही करू नये. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. शिवाय या राहूमुळे संततीविषयक एखादी चिंता त्रस्त करीलसे दिसते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मनःशांती देईल. दररोज स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम आदितीये नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी "ओम सर्पाय नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या सुखस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे कसली तरी चिंता त्रस्त करील. तसेच घरात कोणाशी पटणार नाही. विष भय असल्याने खाद्य पदार्थ खाताना विशेष काळजी घ्या. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत रवि -बुध -गुरु- शुक्र- शनि असे पाच ग्रह असून ते दशम या व्यवसाय स्थानास पोषक आहेत. पण काही ग्रह अनारोग्यकारकही होऊ शकतील. रविमुळे अनारोग्य संभवते. पण हा रवि हितशत्रूंपासून रक्षण करील. क्वचित कोणास हृदयविकाराचा आजार त्रस्त करील. बुध -गुरु हे दोन्ही ग्रह अनुकुल होतील व त्यापैकी बुधामुळे कार्यसिद्धी होईल, व धनलाभ होईल. गुरु ग्रहामुळे आरोग्य चांगले राहील व काहींना नोकरचाकराचे सुख मिळेल. शुक्रामुळे मोहात पडून एखादे व्यसन लागण्याची शक्यता आहे. तसेच या शुक्रामुळे कोणत्याही कलेत प्रावीण्य असूनही कलाकाराला
कलेतील कसब दाखविण्यास संधीच मिळणार नाही. त्यामुळे नैराश्य येईल. कसला तरी आळ येण्याची शक्यता आहे. जपा. शनीमुळे गैरसमजुती होणे, त्यातून भांडणे होणे, शत्रुत्व निर्माण होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि व शुक्र या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत जात आहेत. त्या स्थानी नेपच्यून आहेच. या नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह सप्तम या केंद्रस्थानी गेल्यावर भाग्योदयकारक होईल; पण त्याच्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. दिनांक २० पासून शुक्र ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी येत आहे.. त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळेल, प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत मंगळ व हर्षल असे दोन ग्रह असून मंगळामुळे प्रवासात

मनस्ताप, मानहानी सहन करावी लागण्याची शक्यता आहे. म्हणून शक्यतो प्रवास करू नका. येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल व त्यामुळे संशोधन कार्यात प्रगति करणे शक्य होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळणेही शक्य आहे. काही मंडळींना दूरच्या प्रवासाची संधी मिळू शकेल. येथील मंगळ दिनांक २१ पासून या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्या स्थानी राहू आहेच. या राहूमुळे नोकरीत काही मंडळींना अधिकारपद मिळण्याची शक्यता आहे. काहींचा सन्मान होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ या स्थानी आल्यावर नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल. काही मंडळींना वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे.. किंवा व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होतील. काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून आहे ती नोकरीच मनापासून करावी. श्रद्धा असेल तर दररोज स्नान झाल्यावर "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः " मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत केतू आहे. त्याच्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. त्यासाठी आध्यात्मिक उपासना केल्यास बरे वाटेल. पण या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक लाभ होईल. या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत रवि -बुध - गुरु - शुक्र -शनि असे पाच ग्रह असून रविमुळे अनारोग्य, अपघात, नोकरीत वरिष्ठांचा जाच, संततीचे आजार, नातेवाईक मंडळींशी फारकत, अस्वस्थ मनस्थिती अशापैकी काही घटना घडण्याची शक्यता आहे. बुधामुळे काहींना संततीपासून तर काही ना स्त्रीपासून त्रास होणे संभवते. शनिमुळे स्वभाव स्वार्थी, संशयी बनेल; पण हा शनि चिकाटीने करावयाच्या बौद्धिक कार्यास उपयुक्त होईल. गुरु-शुक्र हे दोन्ही ग्रह अनुकुल असून या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना अर्थलाभ होणे संभवते. प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. सर्व सुख

मिळेल. शुक्रामुळे सर्व प्रकारच्या कलांची आवड असणारांना त्यात्या कलेत प्रगती करणे व सुखसमाधान मिळविणे शक्य होईल. येथील रवि व शुक्र हे दोन ग्रह अनुक्रमे दिनांक १४ व दिनांक २७ पासून या राशीच्या षष्ठ स्थानी जात आहेत. या षष्ठ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून आहेच. या नेपच्यूनमुळे काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. काही मंडळींना उगीचच एखादी आजारभावना त्रस्त करील. काही मंडळींना फसवणूक झाल्याचा त्रास सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या षष्ठ स्थानी आल्यावर तो दशम या नोकरी-व्यवसाय स्थानास पूरक होईल. हितशत्रू पराभूत होतील. पण काही मंडळींना हृदयविकाराचा त्रास होणे संभवते. जपा. पण शुक्रामुळे महिन्याच्या अखेरच्या सप्ताहापासून कलाकार मंडळींना उच्च गुणवत्ता असूनही कलागुण दाखविण्यासाठी संधीच मिळणार नाही. त्यामुळे काही कलाकार मंडळी नैराश्यातून व्यसनाधीन होणे संभवते. जपा. काही मंडळींवर कसला तरी आळ येणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत मंगळ व हर्षल असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. मंगळामुळे अनारोग्य, काही मंडळींना उष्णताविकाराचा आजार त्रस्त वरील. तर काहींना मूळव्याधीचा त्रास, हाडमोड, काबाडकष्ट अशापैकी त्रास होणे संभवते. त्या शिवाय पाणी, वीज यांपासून धोका आहेच. जपा. हर्षलमुळे अपघातभय संभवते. जपा. येथील मंगळ या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात मानहानी, मनस्ताप होणे संभवते. या भाग्यस्थानी वृषभ राशीत राहू आहेच. त्याच्यामुळे प्रवास योग येईल. पण या स्थानी मंगळ आल्यावर काही मंडळींची गुन्हेगारी प्रवृत्ती प्रबळ होईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत रवि -बुध -गुरु-शुक्र-शनि हे पाच ग्रह असून रविमुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, खर्चाची चिंता, कौटुंबिक त्रास, दुःख सहन करावे लागण्याची शक्यता

आहे. बुधामुळे गृहसौख्य व मित्रसुख लाभेल; पण धननाश होणे संभवते. शनीमुळे गृहसौख्य हानी, दुःख व नैराश्य येणे संभवते. पण गुरु -शुक्रामुळे काही मनोनुकुल घटना घडतील. गुरु ग्रह अनुकुल असल्याने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. काही मंडळींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील. पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. शुक्रामुळे ज्यांच्याकडे शेतीवाडी आहे त्यांना त्यापासून लाभ होईल. तसेच ऐषाराम मिळून सुखसमाधान लाभेल. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून महिन्याच्या उत्तरार्धात रवि व शुक्र या राशीच्या पंचम स्थानी जात आहेत. येथील नेपच्यूनमुळे मानसिक स्थिती अति भावनाशील होईल. गूढ संशोधन कार्यास आणि आध्यामिक उन्नतीस हा नेपच्यून अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि व शुक्र या राशीच्या पंचम स्थानी आल्यावर रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होईल व त्यामुळे अनारोग्य, अपघात होण्याची शक्यता आहे. नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. संततीपैकी कोणाच्या आजाराची चिंता त्रस्त करील. शुक्रामुळे सर्व प्रकारच्या कलाकारांना त्यांच्या कलेतील आनंद प्राप्त होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत मंगळ व हर्षल असे दोन ग्रह असून ते दोनही ग्रह अनारोग्यकारक होणार असून विविध कारणांनी ते वैवाहिक जीवनातील सुखात व भागीदारीत व्यापार- व्यवसाय असणारांच्या व्यवसायात बाधा निर्माण करतील. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत राहू असून महिन्याच्या दिनांक २१ पासून मंगळ ग्रह या स्थानी येत आहे. राहूमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होऊ शकेल. काहींना वारसा हक्काने धनलाभ होईल. तसेच या राशीच्या अधिकारी मंडळींना वाममार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा होईल. पण त्यांनी तो मोह कटाक्षाने टाळावाच. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळामुळे मूळव्याधीसारखे उष्णताविकाराचे आजार होणे संभवते. तसेच हाडमोड होण्याचीही शक्यता आहे. त्याशिवाय या मंगळामुळे जलभय, वीजभय असल्याने खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. जलप्रवास करू नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलमृत " स्तोत्राचे पठण करा. तसेच दररोज स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी " ओम त्वष्टे नमः " मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी

" ओम वायवे नमः"मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतु असून तो अनुकुल व सुखदायक असला तरी वाहन अपघातकारक आहे. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत रवि -बुध -गुरु-शुक्र- शनि असे पाच ग्रह आहेत. त्यापैकी रवि आणि शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत जात आहेत. महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह अनुकुल होणार असून तो शासकीय नोकरदार मंडळींना लाभदायक होईल. काही मंडळींना बढती, काहींना मानसन्मान, क्वचित कोणास उच्च पद मिळण्याची शक्यताही दिसते. वरिष्ठ तुमच्या कामावर खूष होतील. शिवाय आरोग्य उत्तम राहील व सुखसमाधान लाभेल. पण तो महिन्याच्या उत्तरार्धात सुखस्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्यामुळे कौटुंबिक जीवनात असमाधानकारक घटना घडतील. कुटुंबात गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. शुक्र ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होणार असून त्याच्यामुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना धन-मान-प्रतिष्ठा अशापैकी काहीतरी प्राप्त होईल. शेतीवाडी असणारांना त्यापासून अर्थलाभ होईल. सुखसमाधान लाभेल व काही विवाहेच्छूनचे विवाह ठरतील. बुध व शनीमुळे हितशत्रूपासून त्रास होणे संभवते. काहींच्या बाबतीत नवे शत्रुत्व निर्माण होणे संभवते. शनीमुळे भावण्डविषयक एखादी चिंता त्रस्त करील. पण काही मंडळींना अपेक्षित अशी उत्तम नोकरी मिळू शकेल. काहींना नवे कार्यक्षेत्र मिळेल. गुरु ग्रह या राशीच्या लेखकवर्गाला अनुकुल होईल व काही लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रसिद्ध होईल. काही मंडळींना प्रवासयोग येतील. पण एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे घरगुती संबंधात गैरसमज, घोटाळे निर्माण होण्याची शक्यता आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत मंगळ व हर्षल असे दोन ग्रह असून ते दशम या व्यवसाय स्थानास पूरक असले तरी मंगळामुळे उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. काही मंडळींना ताप येणे, काहींना रक्तविकार, हृदयविकार अशापैकी आजार होणे संभवते. या राशीच्या मंडळींनी अकारण उगीचच खोल विचार करत बसू नये. नपेक्षा हर्षलमुळे डोकेदुखी किंवा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. काही मंडळींना मुदतीचा ताप

येणेही संभवते. मनस्थिती अस्थिर, चंचल राहील. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत राहू असून महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ ग्रह ह्या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत जात आहे. राहू व मंगळ हे दोन्ही ग्रह वैवाहिक जीवनातील सुखास प्रतिकुल होतील. जीवनसाथी/संगिनीचे आजारपण, इतर कटकटी, गैरसमज यांमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. तसेच ज्यांचे भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहेत त्यांनी गैरसमज, दाद, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व शिव उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर " श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे व "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. त्याचप्रमाणे दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी " ओम इंद्राय नमः" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या व्ययस्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे स्वभाव चंचल,अस्थिर, लहरी असा होण्याची शक्यता आहे. मन स्वस्थ व शांत होण्यासाठी कुलदैवताची उपासना करा. या राशीच्या धनस्थानी मकर राशीत रवि -बुध -गुरु-शुक्र-शनि असे पाच ग्रह आहेत. रवि -शनी मुळे आर्थिक चिंता, वित्त हानी, कुटुंबात अनिष्ठ घटना घडणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. त्याशिवाय काही मंडळींना नेत्रविकार त्रस्त करतील. बुध ग्रह प्रतिकुल असला तरी धनदायक होईल. पण गुरु-शुक्र पूर्णपणे अनुकुल असल्याने रवि -शनीमुळे होणारा मनस्ताप सुसह्य होईल व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, कुटुंबात शुभ घटना घडतील, नोकरी-व्यवसायात प्रगती होईल. आर्थिक लाभ होतील. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि व शुक्र या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर दोघेही अनुकुल होतील व सर्व काही सुखाचेच होईल. पण या तृतीय स्थानी कुंभ राशीत नेपच्यून आहेच. त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल. पण हा नेपच्यून अध्यात्म, गूढविद्या अशापैकी अभ्यासास अनुकुल व यशदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाचे तर काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत मंगळ व हर्षल असे दोन ग्रह असून येथील मंगळ ग्रहामुळे संततिविषयक समस्या किंवा संततीचे आजारविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते.

पण हा मंगळ वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अनुकुल होईल. तसेच येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत राहू असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात पंचम स्थानी असलेला मंगळ या षष्ठ स्थानी येत आहे. त्याच्यामुळे काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास होणे संभवते. काही मंडळींना आर्थिक नुकसान सहन करावे लागेल. त्याशिवाय काही मंडळींना अनारोग्याचा त्रासही सहन करावा लागेल. त्याशिवाय चोरी होणे, दुखापत होणेही संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मनःशांति देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी “ओम निऋतये नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी “ ओम उदकाय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी रवि -बुध -गुरु-शुक्र -शनि असे पाच ग्रह असून त्यापैकी रवि -बुध आणि शनि हे तीन ग्रह प्रतिकुल होणार असून रवि -शनिमुळे अनारोग्य, थकवा, नैराश्य, मनस्ताप, चिंता त्रस्त करतील. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. बुधामुळे चंचल चित्त, धननाश, मित्रद्रोह अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. पण गुरु-शुक्र हे दोन्ही शुभ ग्रह अनुकुल होतील व शुक्रामुळे सुख, चैन, वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळेल. गुरु ग्रह शास्त्रीय संशोधन, बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. लेखक मंडळींना अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि व शुक्र या राशीच्या धनस्थानी जात आहेत. या धनस्थानी कुंभ राशीत नेपच्यून आहेच. रवि व नेपच्यून त्यांच्यामुळे सर्व प्रकारच्या आर्थिक चिंता त्रस्त करतील. त्यामुळे गहिरे नैराश्य येणे संभवते. रविमुळे भांडणे होतील, डोळ्याची दुखणी त्रस्त करतील. पण शुक्रामुळे वैवाहिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मंगळ व हर्षल असे दोन ग्रह असून मंगळामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, असमाधानकारक घटना घडणे संभवते. हर्षलमुळे काहीही झाले तरी सुखसमाधान लाभणार नाही. सतत तक्रारी करत राहाल. आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही.

वास्तुसुख मिळणार नाही. येथील मंगळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या पंचम स्थानी जात आहे. त्यावेळी संततीपैकी कोणाचे आजारपण, कोणाची आचरणविषयक समस्या त्रस्त करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या पंचम स्थानी असलेला राहूही संततिसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. पण हा राहू दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी केतू असून त्याच्यामुळे प्रवासाचे योग येतील. हाती घेतलेल्या कार्यात यश मिळेल. जीवनात सुखोपभोग प्राप्त होईल. श्रद्धा असेल तर "शिवोपासना व श्रीहनुमान उपासना मनःशक्ती व मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा" स्तोत्र वाचा. त्याचप्रमाणे दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी " ओम विश्वेदेवाय नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी "ओम विष्णवे नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम श्री वसवे नमः " मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत रवि -बुध -गुरु-शुक्र-शनि असे पाच ग्रह आहेत. त्यापैकी रवि -बुध व शनि हे तीन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होणार असून त्यांच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे, मानहानी होणे, शारीरिक पीडा होणे, हाती घेतलेल्या कामात अपयश येणे, आर्थिक समस्या त्रस्त करणे, अनारोग्य होणे, अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. अध्यात्म आणि सामाजिक कार्य यांची मनापासून ओढ असणारांना गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे प्रगती करणे शक्य होईल. शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -शुक्र या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी गेल्यावरही रविमुळे अनारोग्य, मनस्ताप, आर्थिक चिंता त्रस्त करतीलच. पण शुक्रामुळे मधून मधून सुखसमाधान मिळेल. या प्रथम स्थानी नेपच्यून आहेच. त्याच्यामुळे मनस्थिती कोमल राहील व जलद मानसिक संवेदना होतील. त्यामुळे मनस्थिती उदास राहील व काही मंडळींना गहिरे नैराश्य येण्याची शक्यता आहे. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत मंगळ व हर्षल असे दोन ग्रह असून मंगळामुळे धैर्य, हिम्मत, महत्त्वाकांक्षा वाढेल. काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. काहींच्या हातून कर्तबगारीचे कृत्य घडेल. पण दुखापत, इजा होणेही संभवते. जपा. येथील हर्षलमुळे स्मरणशक्ती,

कार्यशक्ती प्राप्त होईल व चौकस, चिकित्सक उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल होईल त्यांच्या कार्यात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना परदेशवारीचे योग येणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत राहू असून महिन्याच्या उत्तरार्धात तृतीय स्थानी असलेला मंगळ चतुर्थ स्थानी येत आहे. राहूमुळे कौटुंबिक जीवनात त्रास, अन्य कटकटी, अपयश, अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात मंगळामुळे त्यात अनारोग्य, गैरसमज यांची भर पडेल. जपा. या राशीच्या दशम या व्यवसाय स्थानी केतू असून तो या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत असह्य मनस्ताप देईल. त्यामुळे काही मंडळींना नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसे करू नये. हा सत्त्वपरीक्षेचा काळ आहे असे समजून सहनशील बनून आहे ती नोकरीच प्रामाणिकपणे करावी. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा " स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून, श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी " ओम श्रीवसवे नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः:" मंत्राचा आणि ज्याचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या धनस्थानी मेष राशीत मंगळ व हर्षल असे दोन ग्रह आहेत. ते दोघेही प्रतिकुल होणार असून मंगळामुळे अनारोग्य, आर्थिक चिंता, अनपेक्षितपणे येऊन पडणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या यांचा मनस्ताप सहन करावा लागेल. हर्षलमुळे मनस्थिती अति अस्थिर राहील, त्यामुळे अविचाराने खर्च होणे संभवते. अविचाराने फटकळपणे बोलून समोरच्याचा अपमान कराल. जपा. हातून विचित्र आचरण घडणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी राहू असून महिन्याच्या उत्तरार्धात धनस्थानी असलेला मंगळ या तृतीय स्थानी येत आहे. येथील राहू अनुकुल होणार असून त्याच्यामुळे हातून कर्तृत्व घडेल. पराक्रम घडेल. मन उदार व मोठे होईल. पण या राहूमुळे बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ या स्थानी आल्यावर अनुकुल होईल. त्याच्यामुळे धैर्य, हिम्मत, महत्त्वाकांक्षा वाढेल, व हातून कर्तृत्व घडेल. या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत रवि -बुध -गुरु-शुक्र व शनि असे पाच ग्रह आहेत. हे पाचही

ग्रह अनुकुल होणार असून रवीमुळे आरोग्य उत्तम राहील, नोकरीत बढती, पगारवाढ होईल, व्यापार-व्यवसायात प्रगती व लाभ होतील. बुधामुळे धनलाभ व मित्रलाभ होणे संभवते. त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल. गुरुमुळे इच्छा आकांक्षा पूर्ण होतील, अनेक मार्गांनी धनलाभ होईल, काही मंडळींना वाहनसुख मिळेल, विवाहेच्छूचे विवाह ठरतील व संपन्न होतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. नवे मित्र मिळून मित्रांत वाढ होईल. शुक्रामुळे ऐषाराम साधने प्राप्त होतील. धनलाभ होईल व मनःशांती लाभेल. शनि ग्रह सर्वसाधारणपणे शुभ होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना अर्थलाभ होणेही संभवते. पण येथील शनीमुळे संतति सुखात बाधा येण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि व शुक्र या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत जातील तेव्हा शुक्र अनुकुल व सुखदायक होईल. पण रवि ग्रह प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व त्यामुळे शरीरपीडा, मानभंग होणे संभवते. या व्ययस्थानी कुंभ राशीत नेपच्यून आहेच. त्याच्यामुळे मानसिक व्यग्रता, चिंता, नैराश्य येणे संभवते. पण हा नेपच्यून गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांना उपयुक्त होईल . श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना श्रद्धेने मनापासून ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा -भाद्रपदा आहे त्यांनी “ ओम अहिर्बुध्न्याय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः: “मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====ooooo0ooooo=====